प्रेरणास्थान



युवा उमेद

मेहनत तुमची, मदत आमची

मार्गदर्शक



# भव्य रोजगार मेळावा

APPLY NOW
JOB VACANCY
APPLY NOW

**शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५**
**वेळ: सकाळी ९ वाजेपासून**
**स्थळ: शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड**

"बंधू आणि भगिनींनो,
भोकर विधानसभा मतदारसंघातील तरुणांना आत्मनिर्भर, सक्षम बनविण्यासाठी 'युवा उमेद' उपक्रमांतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याचे वचन मी दिले होते. त्यानुसार २२ फेब्रुवारी २०२५ रोजी अर्धापूर येथे भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात अनेक नामांकित कंपन्या सुशिक्षित बेरोजगारांच्या मुलाखती घेणार आहे. या माध्यमातून पात्र तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

**- आ.श्रीजया अशोकराव चव्हाण**
भोकर विधानसभा मतदारसंघ




## मेळाव्याची वैशिष्ट्ये :

- दहावी-बारावी उत्तीर्ण, आय.टी.आय., पदविका/पदवीधारक युवक-युवतींसाठी रोजगाराची उत्तम संधी.
- आयटी, बँकिंग, मॅन्युफॅक्चरिंग, रिटेल, ॲग्रिकल्चर, फायनान्स, बी.फार्म, नर्सिंग, डिलिव्हरी बॉय, सिक्युरिटी एजन्सी, लॉजिस्टिक्स, एफएमसीजी क्षेत्रातील ७० ते ८० नामांकित कंपन्यांचा सहभाग.
- छ. संभाजीनगर, जालना, पुणे, हैद्राबाद आदी शहरांमध्ये रोजगाराची संधी.
- संभाव्य वयोगट १८ ते ३५ वर्ष, युवतींना समान संधी.
- कंपन्यांचे अधिकारी रोजगार मेळाव्यात मुलाखती घेणार, निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नोकरीचे ऑफर लेटर मिळणार.



आयोजक : **शंकरराव चव्हाण प्रतिष्ठान व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड**

Shankarrao Chavan Pratishthan

अधिक माहितीसाठी फॉलो करा.

@sreejayaachavan

@yuvaumed

या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती.

युवा उमेद
मेहनत तुमची, मदत आमची

# भव्य रोजगार ....मेळावा....

APPLY NOW · JOB VACANCY · APPLY NOW

शनिवार, दि. २२ फेब्रुवारी २०२५, वेळ: स. ९.०० वा.
स्थळ : शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड



## मेळावापूर्व प्रशिक्षण कार्यक्रम

दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी अर्धापूर, जि. नांदेड येथे आयोजित भव्य रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त तरुण-तरुणींची निवड व्हावी, या हेतूने आ. श्रीजया चव्हाण यांनी 'युवा उमेद' अंतर्गत फेब्रुवारी महिन्यात भोकर विधानसभा मतदारसंघातील गावोगावी मेळावापूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे स्वरुप आणि उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे.

- भोकर, अर्धापूर व मुदखेड तालुक्यात अनेक गावांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन.
- प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक लवकरच जाहीर होणार.
- तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी HR Experts ची टीम आपल्या गावात येईल.
- प्रशिक्षण कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या सत्रात HR Experts ची टीम तरुणांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंका व अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करेल.
- ◂ बायोडाटा (Resume) कसा तयार करावा?
  ◂ मुलाखतीच्या वेळी वेश कसा असावा?
  ◂ देहबोली कशी असावी?
  ◂ मुलाखतीत कोणते प्रश्न विचारतात?
  ◂ त्यांना कशी उत्तरे द्यायची?
  आदींचे प्रशिक्षण ही HR Experts ची टीम देईल.
- सदर प्रशिक्षण कार्यक्रमामुळे भव्य रोजगार मेळाव्यात कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसमोर मुलाखत देण्यासाठी उमेदवारांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन ते मुलाखतीत पात्र ठरण्याची शक्यता वाढेल.

### 'युवा उमेद' उपक्रमाची आगामी वाटचाल...

आ. श्रीजया चव्हाण यांच्या संकल्पनेतील 'युवा उमेद' उपक्रमांतर्गत भव्य रोजगार मेळाव्यासह रोजगार मार्गदर्शन, कौशल्य विकास व व्यक्तीमत्व विकास, तांत्रिक प्रशिक्षण, शासकीय योजनांची माहिती, विविध क्षेत्रातील रोजगाराच्या नवीन संधींची माहिती, युपीएससी, एमपीएससी, बँकिंग, पोलीस, लष्कर भरतीची तयारी आदींबाबत मार्गदर्शन करणारे विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित केले जाणार आहेत.

या माध्यमातून भोकर, अर्धापूर, मुदखेड तालुक्यातील तरुणांना रोजगार, स्वयंरोजगाराविषयी अधिक माहिती, मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करावी, असा आ. श्रीजया चव्हाण यांचा हेतू आहे.

आगामी भव्य रोजगार मेळावा आणि या उपक्रमाच्या पुढील कार्यक्रमांना ज्येष्ठांचे आशीर्वाद, सहकार्य आणि युवावर्गाचा प्रचंड सहभाग मिळावा, ही अपेक्षा.

अधिक माहितीसाठी फॉलो करा.

@sreejayaachavan

@yuvaumed

**या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, ही विनंती.**